महाराष्ट्र शासन
कार्यालय पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामिण
पोलीस भवन, सिव्हील लाईन, वेस्ट हायकोर्ट रोड, नागपूर पोलीस
दुरध्वनी क्र. 0712-2566650, ई-मेल- sp.nagpur.r@mahapolice.gov.in

क्रमांक नाजिग्रा/डि-९/पदोन्नती-सफौ/१५७/२०२३ नागपूर, दिनांक /१०/२०२३ 31 OCT 2023

## -: आदेश :-

पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामिण नागपूर या आस्थापने वरील खालील नमूद पोलीस हवालदार यांना सहायक पोलीस उपनिरीक्षक या पदावर पदोन्नती देण्यात येत असल्याने त्यांना आदेश निर्गमितच्या दिनांका पासून वेतनबॅंड एस-१०, पे मॅट्रीक्स २९२००-९२३००/- या वेतन मध्ये सहायक पोलीस उपनिरीक्षक या पदावर त्यांचे सेवाजेष्ठतेनुसार पोलीस अधीक्षक, नागपूर जिल्हा ग्रामीण हया आस्थापनेवरील रिक्त असलेल्या पदावर तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यांत येत असुन ते सध्या नेमणुकीस आहे त्यांच ठिकाणी कार्यरत राहतील.

आदिवासी विकास विभाग, क्र.एमटीसी-१४२०००/प्र.क्र./५३/का.१०, दिनांक २८.५.२००१ तसेच शासन परिपत्रक, सामाजिक न्याय, सांस्कृतीक कार्यालय, विशेष सहाय्यक विभाग क्र. सीबीसी/१०/२००४/प्र. क्र.५७०/मावक-५ दिनांक ५.०३.२००५ नुसार जात वैद्यता प्रमाणपत्र असल्याशिवाय पदोन्नती देवू नये असे निर्देश दिल्याने ज्या पोलीस अंमलदारांनी आपल्या जातीची वैद्यता प्रमाणपत्र कार्यालयात सादर केलेली आहे अशाच पोलीस अंमलदारांना पदोन्नती देण्यात येत आहे.

खालील नमुद पोलीस हवालदार यांच्यावर संबंधीत पोलीस स्टेशन/शाखेत आजपावेतो विभागीय चौकशी/न्यायालयीन खटले/फौजदारी गुन्हे दाखल असल्यास अशा अंमलदारांना पदोन्नती आदेश तामीळ न करता त्यांचा साविस्तर अहवाल या कार्यालयास सादर करुन पुढील आदेशाची वाट पाहावी. सदरची जबाबदारी संबंधीत प्रभारी अधिकारी यांची राहतील.

तसेच पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे पत्र क्रमांक पोमसं/६/२१-से.वा. /संगणक/१०५/२००९,दिनांक ०२/११/२०१९ चे अनुषंगाने दिनांक ३०/११/१९९३ पुर्वी व सध्या सेवेत कार्यरत असलेले वयाचे ५० वर्ष पुर्ण केलेले पोलीस अंमलदार यांना संगणक प्रमाणपत्र सादर करण्यांस सुट देण्यांत आलेले आहे. तसेच शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग,परिपत्रक क्रमांक एसआरव्ही २०१७/प्र.क्र. ४६२/कार्या.१२ दिनांक ०३/०७/२०१८ अन्वये गट अ ते क संवर्गातील पदावर नियुक्ती/पदोन्नती साठी संगणक हाताळणे/वापरबाबतचे ज्ञान आवश्यक ठरविण्यांत आल्याने प्रमाणपत्र सादर न केल्यास वेतनवाढ रोखणे/पदोन्नती रोखणे यासारख्या कार्यवाही करण्यांचे सर्व विभाग प्रमुख यांना निर्देशीत केलेले आहे.

महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्रमांक बीसीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब दिनांक ०७/०५/२०२१ अन्वये तसेच मा. उच्च न्यायालयाचे याचिका क्रमांक २७९७/२०१५ व दिनांक ०४/०८/२०१७ रोजी निर्णया विरोधात राज्य शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुमती याचिका क्र.२८३०६/२०१७ मधील मा. सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून पदोन्नतींच्या कोटयातील रिक्त पदे खुला प्रवर्गात दिनांक २५/०५/२००४ रोजीच्या सेवाजेष्ठतेच्या स्थितीनुसार केवळ तात्पुरत्या स्वरुपात भरण्यांत यावीत असे निर्देश असल्याने खालील नमुद पोलीस हवालदार यांना सहायक पोलीस उपनिरीक्षक या पदावर पदोन्नती देण्यांत येत आहे.

| Sr. No | DPC No. | Rank | B.No. | NAME | CURRENT POSTING | APPOINTMENT DATE | H.C PRAMOTION DATE | APPOINMENT CATEGERY/ V.D | PROMOTION CATOGERY |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 90 | 1578 | HC | PRAKASH DAULAT GEDAM | MT | 05/06/1993 | 28/09/2016 | ST/YES | OPEN |
| 2 | 91 | 503 | HC | GANGAPRASAD PACHAJI WARKHADE | PARSHIVNI | 05/06/1993 | 28/09/2016 | ST/YES | OPEN |
| 3 | 92 | 1682 | HC | PARKASH GULABRAO UIKE | PHQ | 22/06/1994 | 28/09/2016 | ST/YES | OPEN |

पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांचे अध्यक्षतेखाली पदोन्नती समीतीची बैठक दिनांक १८/०९/२०२३ रोजी घेण्यांत आलेली आहे. त्या बैठकीत वरील पोलीस हवालदार यांना सहायक पोलीस उप निरीक्षक या पदावर पदोन्नती देण्याचे अटी व शर्तीच्या आधीन राहुन तात्पुरत्या स्वरुपात सदर अंमलदार ज्या ठिकाणी आहे. त्या ठिकाणी पदोन्नती देण्यांचे मंजूरी देण्यात आलेली असून नमुद पदोन्नती हि दिनांक १/११/२०२३ पासुन लागु राईल.

(हर्ष ए पोद्दार ) भा.पो.से.
पोलीस अधीक्षक
नागपूर ग्रामीण जिल्हा

प्रति,

वरील संबधीत पोलीस अंमलदार नागपूर जिल्हा ग्रामीण
मार्फत:-पोलीस निरिक्षक, नियंत्रण कक्ष नागपूर जिल्हा ग्रामीण नागपूर
१/वरील पदोन्नती झालेल्या अंमदारान कडून मत्ता व दायीत्व फॉर्म भरुन या कार्यालयात सादर केल्यानंतर सदचे आदेश तामिळ करण्यात यावे. हि सर्वस्वी जवाबदारी आपली राहील .
प्रत- डी-९ सी/१२/१३/१४/१९/१९ (अ) यांना माहीती व आवश्यक कार्यावाही करीता.
२/-शासन निर्णय वित्त विभाग कमांक पीएचवाय/१०८२/सीआर/११००(२)/एसईआर-३, दिनांक ०६.११.१९८४ अन्वये पदोन्नतीनंतर वरिष्ठ पदावर वेतनवाढ दिल्यानंतर वेतन निश्चिती करण्याबाबत विकल्प द्यावयाचा असेल तर तो पदोन्नतीवर हजर झालेल्या दिनांकापासुन एक महिन्याच्या आत द्यावा. व अश्याप्रकारचा विकल्प न दिल्यास पदोन्नती पदावरील वेतन निश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा वेतन नियम ११(१) (अ)अन्वये केली जाईल यांची तसेच वित्त विभाग **शासन परिपत्रक कमांक संकीर्ण-२०२१/प्र.क्र.५२/सेवा-३ दिनांक २२/११/२०२१ अन्वये वचन पत्र सादर करणे आवश्यक आहे.** वरील प्रमाणे संबधीत अंमलदार यांचे निर्देशनास आणून दयावे. विहित मुदतीत विकल्प सादर न केल्यास त्यांच्या विचार होणार नाही.
३/- वरील पोलीस हवालदार यांना सहायक पोलीस उप निरिक्षक या पदावर पदोन्नती झालेले अंमलदारा पैकी जे प्रतिनियुक्तीवर असतील त्यांनी आपल्या प्रतिनियुक्तीच्या ठिकाणी सहायक पोलीस उप निरिक्षक पद उपलब्ध नसल्यास तात्काळ कार्यालय प्रमुखाच्या आदेशान्वये तेथून कार्यमुक्त होवून या कार्यालयात आमद दयावी.